# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०११११०
तारेचा पत्ता : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०.२५६९३८९९

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ : शै.प्रवेश/६०८३

दिनांक : २० जून, २००८

प्रति,
मा.विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग,
पुणे विद्यापीठ,
पुणे ४११ ००७.

*विषय : स्कॉलरशिप / फ्रीशिपबाबत.*

महोदय,

शैक्षणिक वर्ष सन २००८—०९ करिता आपल्या विभागात शिक्षण घेणा—या मागासवर्गीय तसेच खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती/फ्रीशिप/सवलती उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

१. एस.सी.शिष्यवृत्ती/फ्रिशिप
२. एन.टी. शिष्यवृत्ती/फ्रिशिप
३. एस.बी.सी. शिष्यवृत्ती/फ्रिशिप
४. ओ.बी.सी. शिष्यवृत्ती/फ्रिशिप
५. एस.टी. शिष्यवृत्ती/फ्रिशिप
६. अहिंदी शिष्यवृत्ती
७. एकलव्य आर्थिक योजना
८. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती
९. अपंग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती
१०.*ई.बी.सी.सवलत योजना }
११.*पी.टी.सी.सवलत योजना (प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी सवलत) }
१२.*एस.टी.सी.सवलत योजना(माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी सवलत) }
*प्रकाशन विभागात आवेदनपत्रे उपलब्ध होतील.
१३. संरक्षण खात्यातील सेवकांचे पाल्यांकरिता सवलत योजना
१४. माजी सैनिकांच्या पाल्यांकरिता सवलत योजना

वरील आवेदनपत्राच्या को—या प्रती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.सदर आवेदनपत्रे आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांकडून भरुन घेवून दिनांक १४ ऑगस्ट, २००८ अखेर या कार्यालयाकडे नोंद करुन पाठवावीत.

शिष्यवृत्ती/फ्रिशिप आवेदनपत्रे भरुन घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना सोबत पाठवित आहोत. कोणत्याही विद्यार्थ्याला आवेदनपत्र घेण्यासाठी भरुन परत देण्यासाठी या कार्यालयात पाठवू नये, ही विनंती.

शिष्यवृत्ती/फ्रिशिप/सवलती याबाबतची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

20.06.08

उपकुलसचिव,
म.वि.वि.मं.

सोबत : १. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग व विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती/फ्रिशिपबाबत मार्गदर्शक सूचना.

प्रत माहितीसाठी :

१. मा.कुलगुरु यांचे कार्यकारी सहायक
२. मा.कुलसचिव यांचे स्वीय सहायक

## मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग व विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती/फ्रिशिपबाबत मार्गदर्शक सूचना.

१. मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिप आवेदनपत्रे दाखल करणे आवश्यक आहे. आवेदनपत्र न भरल्यास मागासवर्गीय असूनही संपूर्ण फी भरावी लागेल याची सूचना विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

२. प्रचलित शासन आदेशानुसार फक्त एम.बी.ए. व एम.सी.ए. या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी.या प्रवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशिप अदा केली जाईल.

३. एम.बी.ए./एम.सी.ए. व्यतिरिक्त इतर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी डी.टी.एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी.या प्रवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी आकारणी करावी.

४. अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क/इतर शुल्क यांची आकारणी करु नये. अशी फी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून वसुल केल्यास समाजकल्याण खात्याकडून कारवाई होऊ शकेल. याची कृपया नोंद घ्यावी.

५. एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी. शिष्यवृत्तीकरिता मागील वर्षाची (सन २००७—०८) उत्पन्न मर्यादा रुपये १,००,०००/— (एक लाख रुपये) इतकी आहे. तसेच फ्रिशिपकरिता उत्पन्न मर्यादा एक लाख रुपयांपुढे राहील. एन.टी.प्रवर्गातील धनगर व वंजारी व त्यांच्या तत्सम जाती व इतर मागासवर्गातील सर्व जाती यांना उत्पन्नाची मर्यादा रु. ४,००,०००/—(चार लाख रुपये) लाखापर्यन्तच लागू राहील.

६. एस.टी.शिष्यवृत्तीकरिता उत्पन्न मर्यादा १,०८,०००/— (एक लाख आठ हजार रुपये) इतकी राहील. फ्रिशिपकरिता उत्पन्न मर्यादा १,०८,०००/— (एक लाख आठ हजार रुपये) च्या पुढे राहील.

# शिष्यवृत्ती/फ्रिशिप आवेदनपत्रे भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

आवेदनपत्रे सुवाच्च अक्षरात संपूर्ण भरावे. कोणताही रकाना रिकामा ठेवू नये. आवेदनपत्रासोबत खालील कागदपत्रे जोडावीत.

१. महाविद्यालयाचा स्थानांतर दाखला (मूळ प्रत)
२. जातीचा दाखला व मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला.
३. मागील वर्षी मिळालेल्या शिष्यवृत्ती/फ्रिशिपबाबतचे आदेशपत्र.
४. एस.सी./एस.टी/एन.टी./ओ.बी.सी.आणि एस.बी.सी.या प्रवर्गातील उमेदवाराचे जात पडताळणीचे प्रमाणपत्र.
५. प्रथम/व्दितीय/तृतीय वर्षाच्या गुणपत्रिका (झेरॉक्स प्रती)
६. विद्यापीठाची फी भरल्याची पावती तसेच वसतिगृह असल्यास त्याचा दाखला.
७. विद्यार्थी दुस—या जिल्हयातील असल्यास जिल्हा बदली प्रमाणपत्र.
८. वडील हयात नसल्यास वडिलांचा मृत्यू दाखला.
९. शिक्षणात खंड पडलेला असल्यास सक्षम अधिका—यांचे गॅप सर्टिफिकेट व शपथपत्र.
१०. शिष्यवृत्ती अर्जावर स्वत:चा पासपोर्ट फोटो लावावा व त्यावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का असावा.
११. विद्यार्थिनीचे लग्न झाले असल्यास पतीचा उत्पन्न दाखला.
१२. तहशीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला आवश्यक.

## अहिंदी स्कॉलरशिप आवेदन पत्राबाबत.

१. आवेदनपत्रावर स्वत:चा फोटो लावावा. त्यावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा.
२. मागील वर्षाची गुणपत्रिका (साक्षांकित)
३. उत्पन्नाचा दाखला
४. विद्यापीठात फी भरल्याची पावती.
५. विद्यार्थी हिंदी विषयाचा पूर्णवेळ अध्ययन करणारा असावा.
६. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. मातृभाषा हिंदी नसावी.

## एकलव्य आर्थिक सहाय्य योजना.

१. पदवी परीक्षेस विज्ञान शाखेकरिता किमान ७० टक्के गुण तर कला, वाणिज्य, विधी शाखेकरिता किमान ६० टक्के गुण असावेत. (गुणांची टक्केवारी कमी/जास्त होण्याची शक्यता असते.)

२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.७५,०००/—पेक्षा कमी असावे.
३. नूतनीकरणाकरिता किमान ७५ टक्के उपस्थिती व पहिल्या वर्षी सर्व विषयात उत्तीर्ण होवून किमान ५० टक्के गुण आवश्यक आहेत.

## अपंग विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्ती.

१. आवेदन पत्रावर स्वत:चा फोटो लावावा व त्यावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी घ्यावी.
२. त्रिस्तरीय डॉक्टरांनी स्वाक्षरी व सही असलेले ससून हॉस्पिटल, पुणे यांचा अपंगत्वाचा दाखला.
३. मागील वर्षाची गुणपत्रिका
४. विद्यापीठात प्रवेश घेतल्याबाबतचा दाखला.

## ई.बी.सी.अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.

१. फॉर्मवर सरपंच यांची स्वाक्षरी घ्यावी.
२. उत्पन्न मर्यादा रु.१५,०००/— इतकी राहील.
३. अर्जावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी/शिक्का आवश्यक आहे.
४. विद्यापीठात फी भरल्याची पावती.
५. मागील वर्षाची गुणपत्रिका.

## एस.टी.सी./पी.टी.सी.आवेदनपत्राबाबत माहिती.

१. अर्जावर शाळेच्या मुख्याध्यापकांची स्वाक्षरी व शिक्का आवश्यक आहे.
२. गटशिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.
३. शाळेचा मान्यतेचा क्रमांक लिहावा.
४. विद्यापीठाची फी भरल्याची पावती.
५. अर्जावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी/शिक्का असावा.
६. मागील वर्षाची गुणपत्रिका.

## माजी सैनिक/संरक्षण दलातील कर्मचा—यांच्या पाल्यांना मिळणा—या शैक्षणिक सवलतीबाबत.

१. मागील वर्षाची गुणपत्रिका.
२. प्रवेश घेतल्याबाबतचे प्रवेशपत्र (फी पावती)
३. जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड यांचे सेवेत असल्याबाबतचे पत्र जोडावे.
४. माजी सैनिकांच्या पालकांचा डिस्चार्ज दाखला जोडावा.

## राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती.

१. अर्जावर विद्यार्थ्यांचा फोटो असावा. त्यावर विभागप्रमुखांची सही व शिक्का असावा.

२. विद्यार्थ्यांच्या पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न रु.१,००,०००/— पेक्षा कमी असावे.

३. मागील तीन वर्षाच्या गुणपत्रिका तसेच फी भरल्याची पावती जोडावी.

## महत्वाच्या सूचना —

१. एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी./एस.टी. या प्रवर्गीय विद्यार्थ्यांची प्रथम वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाली असल्यास सलग व्दितीय वर्षाकरिता शिष्यवृत्ती आवेदनपत्र भरण्याची आवश्यकता नाही.

२. ई.बी.सी./पी.टी.सी./एस.टी.सी./सर्व्हिसमन/एक्स. सर्व्हिसमन/एकलव्य/अहिंदी/अपंग/राष्ट्रीय गुणवत्ता या शिष्यवृत्ती सवलती घेवू इच्छिणा—या विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क/इतर शुल्क पूर्ण भरणे जरुरीचे आहे.

३. एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी.स्कॉलरशिपकरिता पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न रु.१,००,०००/— पेक्षा कमी असावे. तसेच फ्रिशिपकरिता उत्पन्न मर्यादा रु.१,००,०००/— च्या पुढे राहील.

४. एस.टी.स्कॉलरशिपकरिता उत्पन्न मर्यादा रु.१,०८,०००/—पर्यन्त राहील.

५. एस.टी.फ्रिशिपकरिता उत्पन्न मर्यादा रु.१,०८,०००/— च्या पुढे राहील.

६. व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करुन अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास शिष्यवृत्ती मिळत नाही.

७. शैक्षणिक गॅप असल्यास व्दितीय वर्षाचे स्कॉलरशिप/फ्रिशिप आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे.

८. आवेदनपत्राबरोबरच वसतिगृह असल्यास **वसतिगृह प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक आहे.

९. स्कॉलरशिप/फ्रिशिपच्या धनाकर्षासह विद्यार्थ्यास वित्त विभागाकडून त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येते. सदर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

१०. शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्याची वर्गातील उपस्थिती ७५ टक्के असणे आवश्यक आहे. हे मा.विभागप्रमुखांनी प्रमाणित करावे.

११. नूतनीकरण करताना मागील वर्षी ज्या अभ्यासक्रमास विद्यार्थी शिकत होता ती परीक्षा त्याने उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे.

१२. शिष्यवृत्ती/फ्रिशिप आवेदनपत्रासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे विभागप्रमुखांनी साक्षांकित केलेली असावीत.

१३. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती/फ्रिशिप आवेदनपत्र सादर केल्यास जात पडताळणी दाखला जोडणे आवश्यक आहे.

१४. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक व परीक्षा शुल्क घेवू नये.

१५. एका विद्यार्थ्यास **एकच** शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिप किंवा सवलत मिळेल.